# इस्लामिक स्टेट – २

**चंद्रशेखर पुरंदरे**

धार्मिक मूलतत्त्ववाद जगभर फोफावताना दिसतो. त्याची तीव्र पण तुरळक, स्थानिक उदाहरणे सर्वत्र आढळतात. पाकिस्तानात शियांचे शिरकाण सतत चालू असते. आपल्याकडे घर-वापसीपासून नादिया-हरियाणापर्यंत तो प्रकटतो. अमेरिकेत हिंदू मंदिरांचे विद्रुपीकरण, धमक्या, प्रसंगी खूनही होतात, वगैरे. पण सामूहिक स्तरावर मोठ्या भूभागावर हा मूलतत्त्ववाद पसरू लागला की तो काय थराला जातो ते मध्यपूर्वेतील इस्लामिक स्टेट (यापुढे 'ISIS' किंवा 'स्टेट') दर्शवत आहे.

डिसेंबर २०१४ च्या 'आंदोलन'मध्ये 'स्टेट'चा सविस्तर आढावा घेतला आहे. म्हणून या लेखात प्रामुख्याने तद्नंतरच्या घटना व स्टेटचा आदर्शवाद यांचा परामर्श आहे.

तरीही, थोडक्यात पार्श्वभूमी अशी : इराक, सीरिया, लिबिया या मध्यपूर्वेतील शेजारी देशांमध्ये २०११ पासून विविध कारणांनी अराजक सुरू झाले. इराकमधून अमेरिकेने काढता पाय घेतल्यावर शिया-सुन्नी-कुर्द वैर उफाळले. सत्ता सोडायला ठाम नकार देऊन सीरियात बशर असदने स्वत:च्याच जनतेवर अनन्वित अत्याचार सुरू केले. आजवर दोन-अडीच लाख निरपराध ठार मारले गेले आहेत आणि देशाची एक तृतीयांश लोकसंख्या अंतर्गत विस्थापित किंवा शेजारच्या देशात निर्वासित झाली आहे. लिबियात गदाफीच्या पाडावानंतर अनेक प्रादेशिक आतंकवादी सशस्त्र संघटना उभ्या राहिल्या व त्यांनी केंद्राची सत्ता झुगारून दिली. तात्पर्य, या तीनही देशात मोठ्या भूभागात कोणाचेच नियंत्रण नाही. या पोकळीत स्टेटची निर्मिती झाली.

या भागात त्यांच्या इस्लामच्या अन्वयार्थानुसार ७-८व्या शतकात किंवा १२-१३व्या शतकात असणारी कडवी असहिष्णु सुन्नी इस्लामी राजवट त्यांना आणायची आहे. त्यानुसार स्त्रिया गुलाम असतील. शिक्षण फक्त इस्लाम धर्माचे, पोशाख 'अधिकृत' मुस्लिम, चोरांचे हात तोडणे, व्यभिचारींना दगडांनी ठेचून सार्वजनिक ठार मारणे, इत्यादी कायदे अस्तित्वात येतील. इस्लामच्या या पुनरुज्जीवनासाठी त्यांना जगभरातून तरुण स्वयंसेवक मिळत आहेत. एका अंदाजानुसार आजवर असे २०,००० तरुण जगभरातून (त्यात ३४०० पाश्चात्त्य) सीरियात आले आहेत.

पहिल्यापासून बँकांवर दरोडे, नागरिकांना (विशेषत: पाश्चात्त्य) ओलीस ठेवून प्रचंड खंडणी उकळणे, लूटमार, स्मगलिंग व आता तेलाच्या व्यापारावर नियंत्रण अशा मार्गांनी ISIS ने अवाढव्य पैसा गोळा केला आहे. पैशानंतर पुढची जरूरी शस्त्रास्त्रांची. सीरियातील अराजकाच्या क्षेत्रातील शस्त्रसाठ्यावर दरोडे, छोट्या चकमकीत सीरियन सैन्याला हरवून त्यांची आधुनिक शस्त्रे हस्तगत करणे - अशी शस्त्रास्त्रांची जमवाजमव केली. मग सुरूवातीला सीरिया व इराकच्या काही भागात बस्तान बसवून आता ISIS लिबिया या शेजारच्या देशात शिरकाव करत आहे. देशाच्या तीन प्रदेशांत अशाच अतिरेकी मुस्लिम संघटना उदयाला आल्या आहेत. त्यांनी नायजेरियातील बोको हराम (त्याचाही आढावा आधीच्या एका लेखात घेतला आहे) प्रमाणेच ISIS ला पाठिंबा जाहीर केला आहे.

**ISIS चा हिंसाचार**

मागील वर्षी ब्रिटिश, फ्रेंच, अमेरिकन नागरिकांचा शिरच्छेद करून ते व्हिडिओ इंटरनेटवर ISIS ने प्रसृत केले. हे तीनही देश ISIS विरुद्ध कारवाई करत असल्याचा हा निषेध. वैयक्तिकदृष्ट्या या नागरिकांचा काहीच अपराध नव्हता. या वर्षी दोन जपानी नागरिकांची अशीच हत्या करण्यात आली. कारण त्यावेळी मध्यपूर्वेत जपानी पंतप्रधान हजर होते. त्यांनी या भागातील पीडितांसाठी चार कोटी डॉलर्सची मदत जाहीर केली. वस्तुत: या मदतीचा ISIS-सीरिया-इराक यांच्या वैराशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. जे निरपराध नागरिक या संघर्षात होरपळतात, त्यांच्या वेदनेवर ही उपाययोजना होती. पण ISIS ने दोन ओलीस जपानी नागरिकांच्या मुक्ततेसाठी नेमकी त्याच रकमेची चार कोटी डॉलर्सची खंडणी 'पुढच्या ४८ तासात' मागितली. ती खंडणी येण्याचे लक्षण दिसेना तेव्हा या ओलिसांचा शिरच्छेद करण्यात आला. परत त्याचाही व्हिडिओ इंटरनेटवरून जगाला दाखवण्यात आला. हे प्रदर्शन कमी म्हणून की काय एका युद्धकैदी जॉर्डनियन वैमानिकाला प्राणिसंग्रहात प्राण्यांसाठी असतात तशा पिंजऱ्यात उभे करून जिवंत जाळण्यात आले. कारण ISIS च्या विरोधी कारवाईस वरील पाश्चात्त्य देशांबरोबर जॉर्डन या देशाचाही सहभाग आहे. खेरीज, लिबियात मजुरी करून स्वत:ची व घराची उपजीविका चालवणाऱ्या २२ गरीब इजिप्शिअन ख्रिश्चनांचे शिरच्छेद, ISIS सोडून पळून जाऊ पाहणाऱ्या १०० माजी 'सैनिकांचे' शिरच्छेद, सिनाईतील हत्या, १८ मार्चला ट्युनिशिया देशाच्या राजधानीत संग्रहालयावर हल्ला व २० युरोपियन पर्यटकांची हत्या, इजिप्शियन सैनिकांची हत्या अशी इतर हत्याकांडे चालू होती व आहेत.

**प्रतिसाद**

जॉर्डनच्या वैमानिकाच्या हत्येचे प्रतिसाद मध्यपूर्वेत तीव्रतेने उमटले. ISIS चे आजवरचे बळी शेकड्यात व प्रामुख्याने मुस्लिम असले, तरी ती वस्तुस्थिती या वैमानिकाच्या हत्येने एकदम मध्यपूर्वेच्या समोर ठाकली. नंतर जॉर्डनच्या राजाने युरोपियन पार्लमेंटपुढच्या भाषणात 'हा मुस्लिमांचा प्रश्न आहे आणि तो मुस्लिमांनाच सोडवायचा आहे' असे स्पष्ट विधान केले.

श्रद्धेच्या पातळीवरचा या घटनेचा परिणाम अधिक खोलात जातो. जिवंत माणसाला जाळून मारणे ही शिक्षा इस्लामनुसार केवळ नरकातच दिली जाऊ शकते. ती देण्याचा अधिकार मानवाला नाही. ते धर्ममान्य नाही. इस्लामी धार्मिक वाङमयात इतर शिक्षांचे दाखले दिले जाऊ शकतात. उदा. 'शत्रू'चा शिरच्छेद करणे, चोराचे हात तोडणे, काही गुन्ह्यांबद्दल सार्वजनिक फटके मारणे, इत्यादी. अशा काही 'शिक्षा' पाकिस्तानात, सौदी अरेबियात दिल्याही जातात. पण जाळण्याचे तसे नाही. त्यामुळे हे ISIS कडून धर्माचे उल्लंघन झाले. सुन्नी पंथाचा सर्वोच्च धर्माधिकारी इजिप्तमधील अल् अझर विद्यापीठाचा अध्यक्ष समजला जातो. त्याने तसे जाहीर केले. (त्याचवेळी त्याने इतर शिक्षा धर्ममान्य आहेत, हेही आवर्जून सांगितले!) त्याचा अर्थातच काही फारसा परिणाम झालेला दिसत नाही.

श्रद्धेच्या संदर्भात दुसरी संलग्न संकल्पना 'जिहाद'. ISIS च्या अनुयायांना Jihadist म्हटले जाते. धार्मिक वाङ्मयातील ही संकल्पना सुष्ट-दुष्ट या द्वंद्वात असावी. खऱ्या मुस्लिमाने सुष्ट प्रवृत्तीच्या रक्षणासाठी आत्मत्यागही करावा ही ती संकल्पना. निदान मुख्य प्रवाही इस्लाम तरी तिचा असा अर्थ लावतो असे मानता यावे. जिहादला हिंसा मान्य आहे का हे विवाद्य आहे. पण ISIS च्या मते हा अन्वयार्थ व्यावहारिक नाही. त्यांच्या मते जिहादची सुरूवात दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना ठार मारण्यानेच होते. ही दुष्ट प्रवृत्ती असणारे लोक म्हणजे इतर पंथीय मुस्लिम आणि सगळे मुस्लिमेतर. असा जिहाद ही सच्च्या मुस्लिमाची नैतिक जबाबदारी आहे आणि ती निभावण्यासाठी मोठे धैर्य लागते. ही सामूहिक हिंसा चढत्या क्रमाने व तीव्रतेने व्हायला हवी तरच अश्रद्ध दबून राहतील. प्रत्येक हिंसक कृत्यात बघ्यांना व अश्रद्धांना धक्का देण्याची क्षमता हवी. आजवरची ISIS ची कृत्ये त्यानुसार आहेत. ही शिकवणूक इंटरनेटवरून प्रसृत करण्यात ISIS प्रगत आहे. Twitter ने ISIS शी संलग्न अनेक खाती वगळली आहेत. तरीही आज ४६,००० अशी खाती आहेत जी ISIS चा प्रचार करतात. यावरून त्यांच्या या क्षमतेचा अंदाज यावा. शिवाय प्रत्यक्ष तशी शिकवणूक देणारे प्रचारक जगभर कार्यरत असतात. त्यामुळे फ्रान्स, ब्रिटनपासून चीनपर्यंत असे उमेदवार ISIS ला सामील झाले आहेत व होत आहेत. मागच्याच महिन्यात १६-१७ वर्षांच्या तीन ब्रिटिश मुस्लिम मुलींनी घरातले दागिने विकले, तिकिटासाठी पैसे उभे केले आणि तुर्कस्तानमार्गे त्या ISIS मध्ये भरती होण्यासाठी सीरियाला रवाना झाल्या. तुर्कस्तानमधील एका बसस्टेशनच्या CCTV वर त्या दिसल्या पण तोपर्यंत त्या पुढे सरकल्या होत्या.

असेच दोन फ्रेंच विद्यार्थी सीरियाला जायला इच्छुक होते पण त्यांना मार्चमध्ये अटकाव करण्यात आला. १५ ते २० या वयात सामाजिक अवहेलना, अस्मितेविषयी संदिग्धता व इंटरनेटवरून होणारा ISIS चा प्रचार यामुळे ही मुले त्या मार्गाला लागतात.

वस्तुत: तेथे पोचल्यावर मुलींवर लैंगिक अत्याचार होतात व जन्मभराची गुलामगिरी नशिबी येते, किंवा हिंसाचाराला भाग पाडले जाते. मुलांचीही हीच परिस्थिती होते. तेथे गर्भार राहिलेल्या, पळून जाऊ इच्छिणाऱ्या 'सैनिकांच्या' कहाण्या आता बाहेर येत आहेत. असे लोक पकडले जातात. वर म्हटल्याप्रमाणे मागच्या महिन्यात अशा १०० लोकांना ठार मारण्यात आले, जेणेकरून इतर इच्छुक पळून जाण्यापासून परावृत्त होतील.

रक्का या सीरियातील शहरात ISIS च्या आदर्शवादानुसार शाळा चालतात. शिक्षण सुन्नी इस्लामचे. बाहेर आलेल्या व्हिडिओनुसार ८-९ वर्षांच्या मुलांना बंदूक कशी चालवावी, शिरच्छेद कसा करावा, बॉम्ब कसे टाकावेत हे 'शिक्षण' दिले जाते.

आज इराक व सीरियात सुमारे दीड कोटी मुले शाळांबाहेर आहेत. ISIS च्या अंमलाखाली नाहीत तरी ती एकूण अशा हिंसेच्या वातावरणात वाढत आहेत. ती हीच हिंसा आपल्या भावी जीवनात जगण्याची पद्धत म्हणून अंगीकारणार हा मध्यपूर्वेला (आणि जगाला) धोका आहे. ही आकडेवारी व अनुमान युनिसेफच्या मार्चच्या अहवालानुसार आहेत.

**इतर विध्वंस**

तलेबान राजवटीत अफगाणिस्तानातील प्राचीन व मानवी इतिहासातील अमूल्य बौद्ध शिल्पे नष्ट करण्यात आली. तोच प्रकार ISIS करत आहे. मोसूल या त्यांच्या ताब्यातील शहरातील २-३ हजार वर्षांपूर्वीची स्मारके, संग्रहालयातील वस्तू हातोड्याने फोडण्यात आली. आपल्या इतिहासातील मूर्तिभंजनापेक्षा हे निराळे आहे कारण ती स्मारके किंवा शिल्पे कोणालाच पूज्य नव्हती. हा निखळ विध्वंस.

**ISIS विरोधी आघाडी**

अमेरिका-एमिरेटस्-जॉर्डन यांनी संयुक्तपणे ISIS च्या तळांवर हवाई हल्ले चालू केले. इजिप्तनेही लिबियातील तळ नष्ट केले. परंतु हे हल्ले अचूक नसल्याने त्यात निरपराध नागरिकही

*(पान २१ वर)*

**जगभर** *(पान ११ वरून)*
मारले जातात. टिक्रिट या इराकमधील शहरात सद्दाम हुसेनचा जन्म झाला होता. त्या शहराचा ताबा परत मिळवण्यासाठी इराकी सैन्य, शिया पंथीयांचे स्वयंसेवी सशस्त्र सैन्य आता ISIS विरुद्ध लढत आहे. त्यातील गुंतागुंत लक्षणीय आहे कारण ती मध्यपूर्वेतील इतरत्रच्या परिस्थितीची प्रातिनिधिक आहे.

ISIS सुन्नी आहे. गेल्या वर्षी टिक्रिटवर आक्रमण केल्यावर त्यांनी तेथील हजाराहून अधिक शिया नागरिक - ते शिया आहेत म्हणून - ठार मारले. शियांच्या मते ISIS बरोबरच त्यात स्थानिक सुन्नीही सामील होते. त्याचबरोबर पोशाख बदलून इराकी सैन्यही. त्यामुळे आज ISIS चा पाडाव त्या शियांना दिलासा देणारा असला तरी उद्या शेजारी जुनाच सुन्नी येणे त्यांना आवडणार नाही. तसेच गतवर्षीच्या हत्याकांडाच्या अपराध्यांना शिक्षा व्हावी अशी त्यांची मागणी आहे.

एकूण चित्र पाहता, पाश्चात्त्य हस्तक्षेपाखेरीज ISIS ला आळा बसणार नाही. अन्यथा इराक व सीरियाचा नकाशा बदलला आहेच तो कायम होईल आणि अस्तनीतला हा निखारा सगळीच मध्यपूर्व आणखी हिंसक करेल. त्यांचे ते राहिले तरी, ISIS चा दम पुढची १५-२० वर्षे टिकेल. नंतर त्यांची साधनसंपत्ती संपुष्टात येईल. तोपर्यंत एक पिढी बरबाद होईल.

पाश्चात्त्य हस्तक्षेप झाला तरी प्रश्न सुटणार नाही. वसाहतवादाचा इतिहास पाहता पाश्चात्त्य शक्ती व्यापारीकरणाच्या मोहात सामाजिक दुर्लक्ष करतील असेच दिसते. ISIS जरी या भागात नेस्तनाबूत झाले, तरी आजचे आयात सैन्य परतल्यावर तोच हिंसक आदर्शवाद आपल्याबरोबर मायदेशी नेतील ही शक्यताही नाकारता येत नाही.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*